दिनांक : - ०५.०१.२०२२

# सिडको कोविड योद्धे व गणवेषधारी व्यक्ती योजनेतील अर्जदारांच्या कागदपत्रे पडताळणीचा निकाल जाहीर

सिडको महामंडळामार्फत राबविण्यात आलेल्या **कोविड योद्धे व गणवेषधारी व्यक्ती सोडत -२०२१** मधील अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू असून त्यात पात्र ठरलेल्या व्यक्तीचा निकाल टप्पा-टप्प्याने जाहीर करण्यात येत आहे. प्रथम टप्प्यामध्ये २४५ अर्जदार पात्र ठरले असून त्यापैकी एकूण २०६ अर्जदारांचे वाटपपत्र निवारा केंद्राच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उर्वरित अर्जदारांचे निकाल घोषित करून वाटपपत्र देण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर सुरू आहे.

उपरोक्त अर्जदारांच्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रुटी आढळल्यास कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांना असून सदरहू अर्जावर नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००९ अन्वये कार्यवाही करून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांच्या सदनिकेचे वितरण रद्द करण्यात येईल.

अर्जदारांना स्वत:च्या लॉगीनमध्ये जाऊन "माय ॲप्लिकेशन" वर क्लिक करुन वाटपपत्र पाहता येणार आहे.

१) अर्जदाराने cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

२) स्वतःचे यूजर नेम (ॲप्लिकेशन नंबर) व पासवॉर्ड टाकून लॉगिन करावे.

३) नंतर My Application मध्ये जाऊन "Download Allotment" बटण क्लिक करून वाटपपत्र डाउनलोड करावे.

ज्या अर्जदारांना वाटपपत्र मिळालेले आहे असे अर्जदार http://cidco.maharashtra.gov.in/marketing या संकेतस्थळाला भेट देऊन घराच्या हफ्त्यांचा भरणा करू शकतात. ज्या अर्जदारांना बँकेच्या कर्जाकरीता ना-हरकत दाखला हवा असेल त्यांनी निवारा केंद्राच्या लॉगिन मधून "Apply NOC" साठी अर्ज करावा.